महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६/४५९/४२१
ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२४/३८२ दिनांक: २६/०९/२०२४

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता टप्पा २ अंतर्गत (Phase -२) विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याबाबत....**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी, परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता योजना राबविण्यांत येत आहे. या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया टप्पा १ द्वारे (Phase -१) पूर्ण करण्यात आली आहे. आता पुन:श्च खालील वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांकडून अर्ज प्रक्रिया टप्पा २ अंतर्गत (Phase -२) खालील अटीप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

या शिष्यवृत्तीच्या टप्पा २ (Phase -२) अंतर्गत **एकूण १४ रिक्त जागांसाठी उपरोक्त योजनेअंतर्गत** शिष्यवृत्तींसाठीचे अर्ज मागविण्यात येत आहे.

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष व योजने संबंधीच्या सखोल माहितीकरीता संकेत स्थळ:**

- https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, निवड कार्यपध्दती, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहिती प्राप्त करण्यात यावी.

इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करण्यास मुदत वाढ | २७ सप्टेंबर, २०२४ ते ०३ ऑक्टोबर २०२४ |
| २ | उमेदवारांनी खालील प्रमाणे शाखा /अभ्यासक्रम निहाय online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विभागीय कार्यालयात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याचा कालावधी<br>(अ) कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे व उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण या ठिकाणी.<br>(ब) व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या ठिकाणी. | २८ सप्टेंबर, २०२४ ते ०५ ऑक्टोबर २०२४ (सायंकाळी ६.१५ वा. पर्यंत) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण आणि विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पध्दतीने केलेला अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

स्वा /-
(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई